ISSN 2231-1629
Knowledge Resonance
IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

# कोरोना महामारीचा भारतीय समाज जीवनावरील परिणाम

**प्रा. डॉ. मैंद बालासाहेब वैजनाथ**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
वसंतराव काळे महाविद्यालय,ढोकी,ता.जि.उस्मानाबाद.

★★★

**1 घोषवारा** – कोरोना महामारीने संपूर्ण जगात थैमान घातला आहे. कोरोनाने लाखो लोकांचा जीव घेऊन ,अर्थव्यवस्थेचे कंबरडे मोडले आहे. त्यामुळे कोरोना महामारीने संपूर्ण भारतीय सामाज जीवन ढवळून निघाले आहे. covid–19 मुळे सामाजिक संबंधात दुरावा निर्माण होत आहे. मनुश्य एकलकोंडी बनत आहेत. कौटुंबिक कलह वाढले आहेत.उत्पन्न आणि खर्चाचे प्रमाण घटले आहे.गरीबीत वाढ, बेरोजगारीत वाढ झाली आहे. अनेक उद्योग अडचणीत येऊन कामगार वर्गाचे हाल झाले आहेत. लोकांचा ग्रामीण भागाकडे जाण्याचा ओढ वाढला आहे. विद्यार्थ्यांना मोबाईलची सवय लागत आहे. त्यांचे शैक्षणिक नुकसान झाले आहे. वृद्धांना मुक्तपणे फिरणे अवघड होऊन बसले आहे. लॉकडाऊन मुळे उद्योजक,व्यसायिक,व्यापारी व शेतकऱ्यांचे खूप नुकसान झाले आहे. प्रतिकारशक्ती वाढविण्यासाठी लोक आरोग्याकडे लक्ष देऊ लागले आहेत. कोरोनामुळे पर्यावरणात सुधारणा झाली आहे. लोकांना मास्क,सॅनिटाइजरची सवय लागली आहे.एकंदरीत कोरोनाच्या संकटाने संपूर्ण जमाज जीवन उध्वस्त झाले आहे.

**2 प्रस्तावना** – जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरणाच्या या युगात विज्ञानाने मानवी जीवनात आमूलाग्र असा बदल केला आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून मानवाने आपल्या बुद्धीच्या जोरावर नैसर्गिक साधनसामग्रीचा वापर करून खूप प्रगती केली आहे. आज प्रत्येक जण भौतिक सुखाच्या पाठीमागे लागला आहे. आर्थिक विकास साध्य करण्यासाठी प्रत्येक देश एकमेकांच्या खूप जवळ आलं आणि जगाची एक अर्थव्यवस्था बनली ज्यास आपण जागतिक अर्थव्यवस्था म्हणतो. आज या जागतिकीकरणाच्या युगात कोणताही देश स्वतःला इतरांपासून वेगळा ठेवू शकत नाही. जागतिकीकरणामुळे स्पर्धा वाढली लोकांचे उत्पन्न वाढलं, खर्च वाढला, राहणीमानाचा दर्जा सुधारला , भौतिक सुखात वाढ झाली, आर्थिक प्रगतीबरोबरच आर्थिक विषमता वाढत गेली. कर्ज काढून उपभोग घेण्याची प्रवृत्ती वाढली. मनुष्य संपत्तीच्या पाठीमागे, भौतिक सुखाच्या पाठीमागे एवढा लागला की त्याला स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष देण्यासाठी वेळ मिळेनासा झाला. मानसिक ताणतणाव वाढला, प्रदूषणामध्ये वाढ झाली. या स्पर्धेच्या युगात जो थांबला तो संपला असे त्याला वाटू लागले आणि त्यामुळे भौतिक सुखासाठी प्रत्येक जण स्पर्धा करू लागला. मनुष्याची ही जीवनशैली एका सूक्ष्म अशा कोरोना विशाणू मुळे बदली. चीनमधील वुहान शहरातून पसरलेली ही साथ अवघ्या बघता बघता जगभरात पसरली आणि डब्ल्यू एच ओ ने यास महामारी घोषित केले. या महामारीने आज संपूर्ण जगात थैमान घातले आहे. यापुढे जगातील बलशाली सत्ता देखील हतबल झालेल्या आहेत. या साथीने मानवी समूहाला भौतिक सुख किंवा आर्थिक प्रगती पेक्षा जिवंत राहणे हीच प्राथमिकता असल्याची जाणीव करुन दिली. संपूर्ण जगाला वेटिस धरलेल्या कोरोना विशाणूच्या हल्ल्यामुळे मानव जातीच्या दिनचर्येत ,जीवनशैलीत अमुलाग्र बदल घडवून आला आहे. या कोरोनाच्या प्रकोपापासून भारत देखील स्वतःला रोखू शकला नाही. भारतात देखील कोरोनाची साथ दिवसेंदिवस वाढत असलेली दिसून येते.पहिली लाट,दुसरी लाट व येऊ घातलेली संभाव्या लाटेच्या भितीने देशातील संपूर्ण समाज जीवन भयभित झाले आहे. कोरोना महामारीमुळे भारतीय समाज जीवन पूर्णतः विशकळीत होऊन उध्वस्त झाले आहे.

**1.3 संशोधनाची उद्दिष्टे–**

1) Covid–19 चा भारतीय समाज जीवनावर परिणाम अभ्यासणे.
2) Covid–19 चा सामाजिक संबंधावर, अनावश्यक खर्चावर झालेला परिणाम अभ्यासणे.
3) Covid–19 चा सुक्षम उद्योग, कामगार व विद्यार्थी जीवनावरील परिणाम जाणून घेणे.
4) Covid–19 चा कृशी आणि कृशीवर आधारित उद्योगावरील परिणाम अभ्यासणे.

**1.4 संशोधनाची गृहितके–**

1) Covid–19 मुळे सामाजिक संबंधावर परिणाम झाला आहे.
2) Covid–19 मुळे अनावश्यक खर्चाला आळा बसला आहे.
3) Covid–19 चा सुक्षम उद्योग आणि कामगार वर्गावर विपरीत परिणाम झाला आहे.
4) Covid–19 चा वष्द्ध आणि विद्यार्थी जीवनावर परिणाम झाला आहे.
5) Covid–19 कृशी आणि कृशीवर आधारित उद्योगावर विपरीत परिणाम झाला आहे.

**1.5 संशोधन पद्धती**– प्रस्तुत शोधनिबंधासाठी व्दितीय साधन सामुग्रीचा वापर करण्यात आलेला आहे.त्यामध्ये संदर्भग्रंथ, कोश, शोधप्रबंध, मासिक, साप्ताहिके, दैनिके, वेबसाईटस इ.चा आधार घेण्यात आला आहे.

**1.6 Covid–19 – चा भारतीय समाज जीवनावर परिणाम–** कोरोनाच्या साथीने संपूर्ण जगाला आपल्या विळख्यात घेतले असून संक्रमित लोकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे.आज पर्यंत जगात

18 कोटी लोकांना कोरोनाचा संसर्ग झाला आहे. तर 40 लाख लोकांचा मृत्यू झाला आहे. भारतात तीन कोटी पेक्षा जास्त लोकांना कोरोनाचा संसर्ग झाला आहे.तर जवळपास चार लाख लोकांचा मृत्यू झाला आहे.भारतात कोरोनाच्या पहिल्यालाटे पेक्षा दुसरी लाट भयानक ठरली. आरोग्य व्यवस्थेची दानादान उडाली. ऑक्सिजनसाठी तर युध्द पातळीवर प्रयत्न रुग्णांना व नातेवाईकांना करावे लागले. दुसऱ्या लाटेत लोकांचे प्राधान्य हे जीव वाचवणे हेच प्रमुख होते. आनखी संभाव्य तीसऱ्या लाटेच्या भितीखाली समाज दबक्या स्वरात जीवन जगत आहे.

**1) सामाजिक संबंधात दुरावा रू**– कोरोनाविशाणू मुळे सामाजिक संबंध पूर्वीसारखे राहिले नाहीत तर त्यामध्ये दुरावा निर्माण झाल्याचे दिसते. कोरोनाविशाणू पासून आपला बचाव करण्यासाठी आपण सध्या समाजिक अंतराचे पालन करत आहोत. कोरोनाच्या भीतीमुळे जे सामाजिक अंतर आपण राखत आहोत. त्यामुळे सामाजिक संबंधात दुरावा  निर्माण झालेला आहे. आपण पूर्वी मुक्त पणे कसलेही बंधन न पाळता मित्र–मैत्रिण, षेजारी, आपले नातेवाईक यांच्याकडे आवडीने जात होतोत. शॉपिंग, खरेदी विक्री किंवा इतर कोणत्याही कारणासाठी घराच्या बाहेर पडल्यानंतर आपला अनेकांशी संबंध येत होता. यातूनच आपल्या मित्रपरिवारात वाढ होत होती आणि आपण अशा आपल्या मित्र, नातेवाईक, शेजारी यांच्या सुखदुःखात सामील होत होतोत. एकमेकांना समजून घेऊन एकमेकांना आधार धीर देत होतोत. आणि त्यातून आपसात एक प्रकारची प्रेम, आपुलकीची भावना निर्माण होत होती. पण कोरोनाच्या भीतीमुळे एकमेकांकडे जाण्याचे प्रमाण कमी झाले आहे. सोशल मीडिया द्वारे केवळ विचारपूस होऊ लागली. एकमेकांना टाळण्याची प्रवृत्ती वाढत आहे. याचा परिणाम कुटुंब एकलकोंडी बनत असल्याचे चित्र आपणाला दिसत आहे. सामाजिक संबंध दुरावत आहेत. गावातील एखाद्या व्यक्तीच्या अंत्यविधीसाठी नातेवाईक मित्रमंडळी जवळचे लोक यायचे. पण कोरोनाच्या भीतीमुळे, कोरोनामुळे जरी एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाला नसला तरी त्याच्या अंत्यविधी मध्ये फारसे लोक येत नाहीत. अगदी कुटुंबातील व्यक्ती देखील अंत्यविधी करण्यासाठी पुढे येत नसल्याची उदाहरणे आपणाला दिसली आहेत.  विवाह सोहळ्याच्या बाबतीत पण असाच बदल झालेला दिसतो. आता पन्नास लोकांच्या उपस्थितीत, सामाजिक अंतर ठेवून विवाह  होत आहे. सण–उत्सव, विवाह सोहळा यासारख्या उपक्रमात लोकांचा सहभाग कमी झाला आहे. जर लोकांचा सहभाग असाच कमी राहिला तर माणसातील आपुलकी, दया, प्रेम हे कमी होतील आणि नवीन पिढी केवळ सोशल मीडियाद्वारे समाजशील होईल. आपल्या समाजात काही असे लोक आहेत की जे फक्त सोषल मीडियाच्या माध्यमातूनच् लोकांच्या संपर्कात राहतात. पण प्रत्यक्षात मात्र ते त्यांच्या संपर्कात आल्यास एक शब्दही बोलू शकत नाहीत. आणि म्हणून जर या सामाजिक अंतरामुळे मनुष्य असा वागू लागला तर समाजाच्या दृष्टीने हे खूप घातक आहे. यामुळे मनुष्याचा ताण वाढेल. मानसिक रुग्णांचे प्रमाण वाढेल, लोक एकलकोंडी बनतील आत्महत्येचे प्रमाण वाढेल. थोडक्यात कोरोनामुळे सामाजिक संबंधात दुरावा निर्माण झाला आहे.

**2) लोकांच्या खर्चात घट** – कोरोना साथी पूर्वी मागील २०–२५ वर्षांपासून लोकांच्या उत्पन्नात भरमसाठ वाढ झाली होती. आपण आपल्या देशात 1 लाखांपासून 70–75 लाखांच्या दरवशीर्च्या पॅकेजेसची भाषा बोलत होतोत. काही हजारांत उत्पन्न कमावणाऱ्यांच्या घरात आता लाखाने उत्पन्न येऊ लागले होते. त्यांना सर्व उत्तम दर्जाच्या आणि आकर्शक अशा गोष्टींचे आकर्षण वाटू लागले. महागड्या गोष्टींकडे कल वाढला. त्यांना अधिक खर्च करणे शक्य आहे. म्हणून ते साध्या दुकानात न जाता मॉल्सच्या वाटेने जाऊ लागले होते. या ग्राहकवर्गाने 'महागड्या जीवनशैलीचा' मनापासून स्वीकार केलेला दिसून येत होता. परंतु कोरोना विशाणूमुळे हे चित्र बदलत असलेले दिसत आहे. आता कोरोनाच्या भितीमुळे आणि लाकडाऊनमुळे कामगार गावाकडे गेलेले आहेत. अनेकांच्या नोकरी जाण्याच्या मार्गावर आहेत त्यामुळे अनावश्यक खर्च कमी केला जात आहे. पुर्वी काही लोकांचा घरापेक्षा बाहेरच खाण्याकडे कल होता. मुंबई–पुणे–अहमदाबाद अशा काही शहरांत 'किचनलेस होम' ही संकल्पना रूढ होत होती. तरुण जोडप्यांनी तिचा अवलंब करायला सुरुवात केली होती. सकाळी ८ ते रात्री १० पर्यंत घराबाहेर असलेल्या या तरुण जोडप्यांना 'किचन'ची आवश्यकताच भासत नव्हती. सकाळचा चहा–नास्ता बाहेर. दुपारचे जेवण ऑफिसच्या कॅंटिनमध्ये आणि रात्रीचे घरी परतताना चांगल्या हॉटेलमध्ये. ही जीवनशैली बनली होती. पण कोरोना मुळे ही जीवनशैली बदलत असलेली दिसते. आता रेस्टॉरंट मध्ये लोक जाण्यासाठी इच्छुक नाहीत.मार्केट,पर्यटन,रेस्टॉरंट बंद असल्यामुळे लोकांच्या खर्चात मोठी घट झाली आहे.लोक बाहेरचा साधा चहा सुध्दा टाळण्याचा प्रयत्न करताना दिसून येतात. सण, उत्सव,लग्न यासारखे सोहळे घरच्या घरी किंवा मर्यादित लोकांच्या उपस्थितीत साजरी केली जात आहेत. त्यामुळे या कार्यक्रमाचा खर्च देखील कमी झालेला आहे. थोडक्यात कोरोनामुळे खर्च घटलेला आहे हे स्पश्ट होते.

**3) सुक्ष्म उद्योग** – देशाच्या अर्थकारणात सूक्ष्म उद्योग खूप महत्त्वाची भूमिका बजावत असतात. हे छोटे उद्योग आणि त्यांच्या उपजीविकेचे साधन आहे. कोरोनाच्या महामारीला रोखण्यासाठी भारतात लॉकडाऊन केले. या लॉकडाऊनमुळे आणि कोरोनाच्या साथीने अनेकांच्या निर्वाहाचे साधन असलेला हा सूक्ष्म उद्योग अडचणीत आला. लॉकडाऊनमुळे या उद्योगातून उत्पादन किंवा विक्री होत नसल्याने, मात्र भाडे, घरखर्च, कर्ज परतफेड यासारख्या गोष्टी वरील खर्च कसा पूर्ण करायचा आणि जीवन कसे जगायचे हा फार मोठा प्रश्न या कमी भांडवलावर चालणाऱ्या उद्योगापुढे भेडसावत आहे. लॉकडाउन शिथिल केल्यामुळे काही प्रमाणात या उद्योगांना दिलासा मिळाला तरी झालेले नुकसान पचवण्याची ताकद या उद्योगांमध्ये नाही. सलून आणि ब्युटी पार्लर यासारखे व्यवसाय तर फार अडचणीत आले आहेत. कोरोना विशाणूंमुळे अनेकांचा व्यवसाय गेला. लोकांचे उत्पन्न कमी झाले. लोकांनी खर्च कमी केला. याचा परिणाम या छोट्या व्यवसायाच्या

मागणीवर झालेला दिसतो. सूक्ष्म उद्योगांची मागणी घटलेली दिसते.

**4) कामगार वर्गाचे शहरी भागाकडून ग्रामीण भागाकडे स्थलांतर** – कामगार हा उत्पादनाचा एक महत्त्वाचा घटक असून देशाच्या अर्थव्यवस्थेत याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. देशात स्वस्त, मुबलक आणि गतिशील श्रमिक असतील तर देशाची आर्थिक प्रगती होण्यास फार मदत होते. भारतासारख्या कृशीप्रधान, जास्त लोकसंख्येच्या देशात कृशी आणि कृशीवर आधारित उद्योगात 58 टक्के लोकसंख्या गुंतलेली आहे. इंग्लंड, अमेरिका यासारख्या विकसित देशात हेच प्रमाण केवळ दोन ते तीन टक्के आहे. भारतामध्ये शेती क्षेत्रामध्ये छुप्या बेकारीचे प्रमाण फार मोठ्या प्रमाणात आहे. गावाकडे पोट भरत नसल्यामुळे आणि स्वतःची प्रगती करण्यासाठी, स्वतःचे नशीब आजमावण्यासाठी अनेकांनी ग्रामीण भागातून शहरी भागाकडे स्थलांतर केले होते. मोठ्या शहरांमध्ये अनेक व्यवसायांमध्ये रोजंदारीवर छोटे–मोठे काम करणारे कामगार आलेले होते. महाराष्ट्रातील मुंबई, पुणे, नाशिक यासारख्या शहरांमध्ये अनेक वर्षापासून अनेक राज्यातून कामगार आले होते. परंतु कोरोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर सरकारने मार्च अखेर देशभर टाळेबंदी केली त्यामुळे हे कामगार बेरोजगार झाले. यात बहुसंख्य लोक हे रोजंदारीवर जगणारी होती. बेरोजगारीमुळे होत असलेले आर्थिक नुकसान, सातत्याने वाढत जाणारा अनिश्चित स्वरुपाचा लॉकडाऊन, गाठीचा संपत चाललेला पैसा आणि शहरातील कोरोना संसर्गाची वाढती भीती यांचा एकत्रित परिणाम म्हणून काही प्रवासी कामगार आपापल्या मूळ गावाकडे वळली. कामगारांना गावाकडच्या या प्रवासात अनंत हाल–अपेष्टा सहन कराव्या लागल्या. काही जणांचा दुर्दैवी मृत्यूही झाला. कोरोनामुळे कामगारांचे जीवनच बदलून गेले.

**5) विद्यार्थी आणि वृद्ध** – कोरोना पासून शिक्षण क्षेत्र देखील सुटले नाही. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले. शाळा महाविद्यालय बंद केले गेले. शिक्षणाच्या प्रवाहापासून विद्यार्थी दूर होत चालेले आहेत. विद्यार्थ्यांच्या परीक्षा सुद्धा घेता येत नाही. अभ्यास नाही, मैदानी खेळ नाही, बाहेर फिरणे नाही, घरात विद्यार्थी कैद होऊन बसले आहेत. त्यातच ऑनलाइन टीचिंग चा प्रयोग या सर्वांचा मुलांच्या जीवनावर थोडा प्रभाव पडत आहे. मुलांना मोबाईलची सवय लागत आहे. विद्यार्थ्यांचा चिडचिडेपणा वाढत आहे. कोरोनाची भीती जास्त असल्याने त्यांना घराबाहेर पडता येत नाही घरातच ते कैद झाले आहेत. ते एकलकोंडी बनत आहे.

**6) कृशी व कृशीवर आधारित उद्योग**– कोरोनाच्या साथीपासून स्वतःला वाचवण्यासाठी भारतात लॉकडाऊन केले गेले आणि या लॉकडाऊनचा फटका शेतकरी वर्गाला फार मोठ्या प्रमाणात झालेला दिसतो. टरबूज, द्राक्षे, आंबे, भाजीपाला यासारख्या पिकांचे उत्पादन हाती आले असतानादेखील शेतकऱ्यांना लॉकडाऊनमुळे आपल्या मालाची विक्री करता आली नाही. बेभाव किंमती मध्ये त्यांना विक्री करावी लागली. विक्री करण्याचे नवीन आव्हान शेतकऱ्यांपुढे होते. यात शेतकऱ्यांचे फार मोठे आर्थिक नुकसान झाल्याचे दिसून येते. दुधाला देखील योग्य भाव मिळत नसल्याने दुधाची नासाडी झाली.

**7) आरोग्य आणि पर्यावरण** – कोरोनाच्या साथीपासून स्वतःला वाचवण्यासाठी प्रतिकार शक्ती वाढवणे गरजेचे असल्याने आता मनुष्य आरोग्याकडे लक्ष देऊ लागला आहे. लोक पायी फिरणे, योगासन, प्राणायाम करू लागली आहेत. आरोग्याबाबत जागरूक झाले आहेत. लॉकडाऊन व अनावश्यक प्रवास लोक टाळत असल्याने प्रदूशण कमी होऊन पर्यावरणात सुधारणा होत आहे. पूर्वी शहरी भागात रात्री घराबाहेर लोक जास्त वेळ रहात होती, आता मात्र चित्र बदललेले दिसते. लोक फार वेळ घराच्या बाहेर जात नाहीत. त्यांना घरात राहण्याची सवय लागली आहे. अनावश्यक फिरणे कमी झाले आहे. अशा प्रकारचा बदल कोरोनामुळे मनुष्याच्या जीवनात घडून आलेला आहे.

**8) रोजगारा वरील परिणाम** – देशात कोरोनाच्या संकटाने बेरोजगारी मध्ये मोठी भर टाकली आहे. देशात पहिल्या लाटे 14 कोटी तर दुसऱ्या लाटेत एक कोटी लोक बेरोजगार झाले आहेत. देशात बेरोजगारीचा दर 14.7 टक्क्यांपर्यंत वाढली आहे.ही एक गंभीर बाब आहे. अर्थतज्ञ रघुराम राजन यांच्या मते,कोरोनाचा सर्वात मोठा फटका असंघटित कामगार वर्गाला बसला आहे. लॉकडाऊनमुळे असंघटित मजुरांकडे उपजीविकेचे साधन राहिले नाही. त्यामुळे त्यांच्या पुढे अन्न, वस्त्र, निवारा याचा प्रश्न उभा राहिला आहे.

**1.7 सारांश** – भारतातील वाढत्या कोरोनाच्या प्रसाराने संपूर्ण समाज जीवन उद्ध्वस्त झालेले असताना लोकांच्या मनातील कोरोनाची भीती व अनिश्चितता कमी करून जास्तीत जास्त लोकांना कोरोनाची लस घेण्यास प्रवृत्त करणे गरजेचे आहे.तरच भारतातील कोरोना थांबेल व लोक आत्मविश्वासाने जगू लागतील, लोकांच्या मनातील कोरोना विषयीची अनावश्यक भीती काढून टाकावी लागेल. तरच भारतीय समाजाची घडी नव्याने सुव्य वस्थित बसेल व समाजाचा सामाजिक विकास घडून येईल.

***1.8 संदर्भ सूची –***

1) *कोसंबी राजरत्नरू कोरोना भारतातील सामाजिक, आर्थिक परिस्थिती, द वायर मराठी न्यूज– 2020*
2) *मार्थ हेनरिक्स रू मानवता पर कोरोना का कहर प्रकृती को क्या फायदा, बीबीसी हिंदी न्यूज, 9 जून –2020*
3) *IIMS Report, Govt-of India-2020 4, WHO, Coronavirus disease,COVID&19Situation Report – 153, Data as received by WHO from national authorities by 10:00 CEST 21 June 2020*